# कृषि पणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणा
## (Agriculture Marketing Intelligence Services- AMIS)

- **प्रस्तावना:-**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेती व शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो, कारण आजही शेतीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या उदरनिर्वाहासाठी अवलंबून असणाऱ्यांची संख्या ५०% पेक्षा अधिक आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील शेताचा वाटा १६.१% आहे. आपल्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत शेतकरी हा एकमेव असा घटक आहे की, ज्याने उत्पादित केलेल्या शेतमालाला बाजारभाव हा इतर घटकांकडून निश्चित केला जातो. त्याचबरोबर, मागील पाच वर्षांपासून शेतमालाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल उत्पादन व विक्री संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यासाठी अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना बाजारविषयक अपुरे ज्ञान व किंमतीतील चढ-उतारामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या गोष्टी विचारात घेवून शेतकऱ्यांना लागवडपूर्व, लागवडीनंतर व काढणीनंतर बाजार व किंमतीविषयक योग्य ती माहिती पुरविण्यासाठी, जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत "कृषि पणन व माहिती विश्लेषण सेवा यंत्रणा -AMIS" एप्रील २०१६ रोजी स्थापन करण्यात आली आहे, जेणेकरुन या यंत्रणेच्या माहितीच्या आधारे शेतकरी त्याचबरोबर विपणन प्रक्रियेतील अन्य घटकांना योग्य निर्णय घेण्यास मदत होवू शकते.

जगाच्या पाठीवर अशा प्रकारची सेवा देणारी यंत्रणा सन १९६१ मध्ये युनायटेड स्टेट डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर (USDA) विभागाने इकॉनॉमिक रिसर्च सर्विसेस (ERS) या संस्थेच्या माध्यमातून सेवा देण्यास सुरुवात केली. या संस्थेद्वारे प्रत्येक महिन्यास "World Agricultural Supply & Demand Estimates" अहवाल प्रकाशित केला जातो. या अहवालात गहू, तांदूळ, तेलबिया, सोयाबीन, ज्वारी, मका, कापूस, साखर, पोल्ट्री, डेअरी, पशुधन इ. बाबतील अमेरिका व इतर देशातील उत्पादन व वापर या संदर्भातील अंदाज वर्तविले जातात. सन १९४५ मध्ये स्थापन झालेल्या जागतिक अन्न संघटना (FAO) ने सन २०११ पासून आंतरराष्ट्रीय अन्नधान्य बाजारातील पारदर्शकता वाढविणे व आंतरराष्ट्रीय कृषि धोरणांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या हेतूने "Agriculture Market Information System (AMIS)" ची स्थापना केली आहे. या संस्थेव्दारे दरमहा "Market Monitor" अहवाल प्रकाशित केला जातो. या अहवालात गहू, मका, तांदूळ व सोयाबीन या चार पिकांच्या बाबतीत जागतिक उत्पादन, वापर, आयात-निर्यात व किंमतीविषयक अंदाज वर्तविण्यात येतात.

सन २००६ मध्ये भारत सरकारने "राष्ट्रीय कृषि नवोन्मेषक प्रकल्प (NAIP)" भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत देशभर राबविला गेला. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून देशातील दहा कृषि विद्यापिठांमध्ये शेतमालाच्या किंमतीविषयक अंदाज वर्तविणारी यंत्रणा स्थापन करण्यात आली होती. यामध्ये तामिळनाडू कृषि विद्यापिठ, कोईमतूर या विद्यापिठाने प्रमुख भूमिका बजावली आहे. या विद्यापीठांमध्ये कृषि व ग्रामिण विकास अभ्यास केंद्रातंर्गत Domestic and Export Market Intelligence Cell(DEMIC) केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रामार्फत मका, केळी, भाजीपाला, हळद, बटाटा, मिरची, नारळ इ. स्थानिक उत्पादनाच्या किंमती संदर्भात अंदाज वर्तविले जात आहेत. महाराष्ट्रात या प्रकल्पांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला येथील कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभागामार्फत सोयाबीन, तूर, मका इ. उत्पादनाच्या किंमतीचे भविष्यातील अंदाज वर्तविण्याचे काम करण्यात येत होते.

याच अनुषंगाने महाराष्ट्र शासन कृषि व पणन विभागांतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत "कृषि पणन व माहिती विश्लेषण सेवा यंत्रणा" सुरु करण्यात आली आहे.

- **यंत्रणेची उदिष्टे :-**

या यंत्रणेमार्फत कृषि, फलोत्पादन आणि पशुधन वस्तूंचे विपणन व किंमतींबाबत विविध घटकाना त्यांच्या गरजे प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे. याबाबतची माहिती विविध स्त्रोतांव्दारे सतत संकलित करणे. तसेच विविध लाभधारकांना निर्णय घेण्याकरिता उपयुक्त ठरेल असे माहिती संकलन व विश्लेषण करणे. बाजारातील माहिती विश्लेषणाच्या विविध परिणामकारक पध्दती विकसित करणे, महाराष्ट्रातील कृषी व पशुधनाच्या महत्वाच्या वस्तूंचा पुरवठा, मागणी व किंमतींसंबंधी दिर्घकालिन अंदाज वर्तविणारे मॉडेल तयार करणे व ते वेळोवेळी अद्यावत करणे, कृषि पणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणा यंत्रणेची वेबसाईट तयार करुन बाजार व किंमतीविषयी संकलित विविध राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्त्रोतांमधून संकलित केलेली तसेच या यंत्रणेने तयार केलेली माहिती वेबसाईटवर प्रसारित केली जाणार आहे.

विविध घटकांना माहिती पुरविण्याची माध्यमे (उदा. ॲलर्ट्स, आऊटलूक, रिपोर्टस, एस.एम.एस इ.) उपलब्ध करणे यामध्ये निवडक शेतमालाची पेरणी पूर्व आणि काढणीच्या वेळी असलेल्या किंमतीचा समावेश आहे. विविध उपलब्ध माहिती प्रसारित करण्यासाठी आवश्यकतेनुसार दैनिक, दूरचित्रवाणी, भ्रमणध्वनी नेटवर्क, रेडिओ इ. चा वापर करण्याची व्यवस्था तयार करण्याचे नियोजन आहे.

कृषि व कृषी संबंधीत घटक याच्याशी संबंधीत विपणन व किंमती बाबतची माहिती संग्रहीत ठेवण्यासाठी यंत्रणा तयार करणे,विविध घटकांसाठी तज्ञांची सल्ला सेवा पुरविणे शेतकरी व लाभधारकांकरिता कृषी वस्तूंच्या किंमती व विपणन विषयी चर्चासत्र, कार्यशाळा व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे, यंत्रणेने वर्तविलेल्या भविष्यातील शेतमाल किंमतींविषयी अंदाज अचुकते बाबत पद्धती विकसित करणे ठराविक कालावधीने तपासणी करणे आणि त्याचे निष्कर्ष माध्यमाद्वारे प्रसिद्ध व प्रसारित करणे. यंत्रणेच्या सेवा शेतकऱ्याना व विविध घटकांना फायदा करुन देण्यासाठीची पद्धत विकसित करणे यासाठी प्रत्येक वर्षी अभ्यास वर्गाचे आयोजन करणे आणि निष्कर्ष प्रकाशित करणे.

- **सद्यस्थितीमध्ये बाजार विषयक माहिती उपलब्ध असणारे स्त्रोत:-**

महाराष्ट्र राज्यात एकूण ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या अस्तित्वात आहेत. या समित्यांमध्ये शेतमाल उत्पादन व किंमतीची माहिती संकलित केली जाते. याचबरोबर वृत्तपत्रे, रेडिओ, सूचनाफलक व वेबसाईटच्या माध्यमातून याबाबतची माहिती वेळोवेळी प्रसारित केली जाते. तसेच महाराष्ट्र राज्य पणन मंडळ यांच्या मार्फत Market Network (MARKNET) या उपक्रमातून शेतमालाच्या किंमतीची माहिती शेतमालाच्या प्रकारानुसार व बाजार समितीनुसार वेबसाईटवर प्रसारित केली जाते. याचबरोबर कृषी मंत्रालय, भारत सरकार यांच्या AGMARKNET या उपक्रमातून शेतमालाच्या किंमती संकलित करुन वेळोवेळी प्रसारित केल्या जातात, नॅशनल एग्ज कोऑर्डिनेशन कमिटी (NECC) मार्फत अंडया च्या दररोज किंमती विषयक माहिती प्रसारित केली जाते व राष्ट्रीय फलोत्पादन बोर्ड मार्फत फळे, भाजीपाला यांचे उत्पादन व किंमतीसंबंधीची माहिती प्रसारित केली जाते.

राष्ट्रीय स्तरावरील NCDEX व MCX च्या माध्यमातून काही निवडक बाजार समित्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक सूचना फलकांव्दारे शेतमालाच्या किंमती संबंधी माहिती प्रसारित केली जाते. याशिवाय ई चौपाल सारख्या यंत्रणा द्वारे देखील दररोज शेतमालाच्या किंमतींची माहिती प्रसारित करीत आहे. तसेच केंद्र सरकारच्या संबंधित विभागामार्फत विविध वस्तुच्या घाऊक किंमत निर्देशाक दर आठवड्याला प्रसिद्ध केला जातो.

- **माहितीची उपयुक्तता:-**

या यंत्रणेद्वारे विविध स्त्रोतामधुन अचुक व विश्वसनिय माहिता संकलित केली जणार आहे. त्याचे सांख्यकीय विश्लेषण करुन शेतमालाचे पेरणीपूर्व काढणी पश्चात किंमतीचे पूर्वानुमान वर्तविले जाणार आहेत.तसेच कृषि व कृषिशी संबंधित घटकाना शेतमाल निहाय हंगामी, मासिक, वार्षिक, स्पॉट व भविष्यातील मध्यम व दिर्घकालीन अंदाज वर्तविण्यात येतील त्याच प्रमाणे शासनास धोरणात्मक निर्णयासाठी सुचना करण्यात येतील. या यंत्रणे द्वारे पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या आधारे शेतकऱ्यांना विविध पिकांच्या संदर्भात पेरणीपूर्व व काढणीनंतरचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच कोणत्या पिकाचे किती उत्पादन घ्यावयाचे, ते उत्पादन कधी व कोठे विक्री करावयाचे ? या विषयी शेतकऱ्यांना योग्य निर्णय घेता येतील. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल.

सदर माहिती ही शेतकरी, शासन, धोरणकर्ते प्रक्रियादार, उद्योजक, आयात-निर्यातदार,किरकोळ विक्रेते, उपभोक्ता, कृषि विषयक घटक यांना उपयुक्त ठरेल. यामुळे प्रादेशिक, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये शेतमालाचे उत्पादन व किंमतीविषयक धोरणांमध्ये समन्वय साधला जावून दीर्घकालावधीत शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल.

- **अभ्यासासाठी निवडलेली पिके:-**

कृषी पणन व माहिती सेवा यंत्रणेमार्फत एकूण ३० पिकांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामध्ये पहिल्या वर्षी सोयाबीन, तूर, मका व टोमॅटो या चार पिकांचा समावेश आहे. दुसऱ्या वर्षी हरभरा, कांदा, डाळींब, अंडी- कापूस व हळद या सहा पिकांचा व तिसऱ्या वर्षी मूग, करडई, बटाटा, द्राक्षे, काजू, लाल मिरची, उडीद, भुईमूग, पौल्ट्री, लिंबू, व चौथ्या वर्षी ज्वारी, तांदूळ, गहू, बाजरी, रागी, दूध, आंबा, केळी, संत्रा, चिकू या वस्तूंचा समावेश केला आहे.

- **माहिती संकलन, विश्लेषण व प्रसार:-**

सदर यंत्रणेमार्फत निवडलेल्या पिकांच्या संदर्भातील दैनिक,मासिक व वार्षिक शेतमालाची आवक व किंमतीविषयक माहिती महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून गोळा करण्यात येईल. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आवश्यक माहिती विविध दुय्यम माहिती स्त्रोतामधून संकलित केली जाईल. तसेच वायदेबाजारातील माहितीचा वापर विश्लेषणासाठी केला जाईल. संकलित केलेल्या माहितीचे सांख्यिकी विश्लेषण करुन भविष्यातील शेतमालाच्या किंमतीविषयक अंदाज वर्तविण्यात येईल. सदर यंत्रणेमार्फत तयार केलेले अहवाल शेतकरी व इतर घटकांपर्यंत विविध प्रसार माध्यमाद्वारे पोहचविण्यात येईल.

या यंत्रणेमार्फत खरीप हंगाम २०१६-१७ साठीचा पहिला शेतमालाच्या संभाव्य किंमतीचा अहवाल माहे जून २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात प्रसिध्द करण्यात येईल, ज्यामध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०१६ या महिन्यासाठीच्या निवडलेल्या पिकांच्या संभाव्य किंमती वर्तविण्यात येतील. तसेच दरमहा मासिक किंमतीविषयी सुधारित अहवाल प्रसिध्द करण्यात येणार आहेत. या यंत्रणेमार्फत प्रथम वर्षासाठी निवडलेल्या चार पिकांबाबत अभ्यास करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील १० कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या शेतमालाची आवक व बाजारभावाचा मागील १० वर्षांचा अभ्यास करण्यात येत आहे, त्यामध्ये प्रामुख्याने मका, सोयाबीन, तुर व टोमॅटो या पिकांचा अंर्तभाव केला आहे.

सदर कृषि पणन व माहिती विश्लेषण सेवा यंत्रणा एप्रिल २०१६ मध्ये कार्यरत झाली असून या यंत्रणेमार्फत विविध पिके, फळे, भाजीपाला, पशुधन इत्यादि घटकांची परिपूर्ण माहिती संकलित करण्यात येणार आहे. या माहितीचा सुक्ष्म पध्दतीने अभ्यास व विश्लेषण करुन मासिक, हंगामनिहाय व वार्षिक कालावधीसाठीचा शेतमाल किंमतींचा अंदाज वर्तविण्यात येणार आहे. या माहितीचा विनियोग शेतकऱ्यांसह अन्य संबंधीत घटकांना होवून कृषि व पणन क्षेत्रात नजिकच्या काळात भरीव काम होईल असा विश्वास वाटतो.

अशा प्रकारची यंत्रणा शासन स्तरावर कार्यरत नसल्याने जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत सुरु केलेली आहे ही नाविन्यपूर्ण यत्रंणा निश्चितच शेतकरी व अन्य कृषि संबंधित घटंकाना उपयुक्त ठरणार आहे.

***